# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : ३३२६ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२२

**:: परिपत्रक ::**

विषय: **सन, २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन कालावधीत मंत्रालयीन विभागांनी विधान भवन, मुंबई येथे प्रवेश मिळण्यासाठी कोरोना विषाणूचा संसंर्ग टाळण्याच्या दृष्टीने पाळावयाच्या सूचनांबाबत ...**

महाराष्ट्र विधानमंडळाचे **सन, २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२** रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होत आहे. सदर अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिका देण्याबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(१) अधिवेशन कालावधीत विधान भवनात **मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातील खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक, लिपिक, चोपदार/शिपाई** यांनाच प्रवेश देण्यात येणार असल्याने त्याप्रमाणे 'खाजगी सचिव' यांच्या स्वाक्षरीने **दिनांक २ मार्च, २०२२** पर्यंत उपस्थित राहणाऱ्यांची नावे या सचिवालयास कळवावीत.

(२) मंत्रालयीन विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी जास्तीत जास्त २० अधिकाऱ्यांची व ३० कर्मचाऱ्यांची नावे त्यांच्या विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने दिनांक **२ मार्च, २०२२** रोजीपर्यंत या सचिवालयास कळवावीत. जेणेकरून प्रवेशपत्रिका वितरणापूर्वी प्रवेशपत्रिकेवर संबंधितांचे नाव, पदनाम, विभाग इ.माहिती लिहणे सोईचे होईल. **विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(३) सन २०२२ च्या विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाकरिता उपलब्ध करून देण्यात आलेल्या प्रवेशपत्रिकेवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रवेशपत्रिका धारण करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे छायाचित्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा शिक्का असणे अनिवार्य राहील.

(४) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र व प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

.. २/-

(५) मा.मंत्री/राज्यमंत्री आस्थापना तसेच, संबंधित मंत्रालयीन विभागाने दिलेले ओळखपत्र व विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असेल तरच विधानभवनामध्ये प्रवेश देण्यात येईल.

(६) अधिवेशन कालावधीत दैनंदिन अतिरिक्त प्रवेशपत्रिकांची मागणी उप सचिवांच्या स्वाक्षरीने न करता आपल्या **विभागाच्या सचिवांच्या स्वाक्षरीने करावी. सदर प्रवेशपत्रिका फक्त ग-१ कक्ष, १७ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे उपलब्ध होतील.**

(७) हिवाळी अधिवेशन, २०२१ साठी घेतलेल्या प्रवेशपत्रिकांचा दुरूपयोग होऊ नये यासाठी प्रत्येक विभागाने सदर प्रवेशपत्रिका न चुकता परत कराव्यात व त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ साठीच्या अधिवेशनाच्या प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

(८) **विधान भवन, मुंबई येथे प्रवेशासाठी कोविड-१९ लसीकरणाचे दोन्ही डोस पूर्ण झालेल्या मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांनी शासनमान्य प्रयोगशाळेतील RT-PCR चाचणी नकारात्मक (Negative) असल्याचा दिनांक १ व २ मार्च, २०२२ रोजीचा अथवा त्यानंतरचा अहवाल अधिवेशन कालावधीत प्रवेश करतेवेळी सोबत ठेवावा.**

**सदर अहवाल पाहूनच विधान भवन, मुंबई येथे प्रवेश देण्यात येईल. विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सामाजिक अंतर राखणे सोईचे व्हावे यासाठी अधिकारी/कर्मचारी यांनी नियोजित वेळेपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक राहील.**

(९) **वास्तव्याच्या जवळपास शासनमान्य प्रयोगशाळा उपलब्ध न झाल्यास अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे येणारे मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी हे विधान भवन, मुंबई येथे दिनांक १ व २ मार्च, २०२२ रोजी RT-PCR चाचणी करुन घेण्याच्या सुविधेचा वापर करु शकतात. याकरीता त्यांनी www.mls.org.in/covid-report/rtpcr.html या लिंक वर जाऊन तेथे देण्यात आलेल्या वर्गवारी नुसार नोंदणी करुन टोकन क्रमांक प्राप्त करुन घ्यावा व विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वारासमोर उभारण्यात आलेल्या कोरोना चाचणी केंद्र येथे जाऊन टोकन नंबर सांगून कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीचे दोन डोस घेतल्याबाबतचे प्रमाणपत्र व स्वत:चे ओळखपत्र दाखवून कोरोना चाचणी करुन घ्यावी. त्यानंतर विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वार येथे करण्यात आलेल्या व्यवस्थेच्या ठिकाणी संबंधितांना त्यांचे कोरोना चाचणीचे अहवाल उपलब्ध करुन देण्यात येतील. ज्यांचे चाचणी अहवाल नकारात्मक**

**(Negative) असतील अशा व्यक्तींनाच विधान भवन येथे प्रवेश देण्यात येईल.**

(१०) **कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

वरील सुरक्षाविषयक तसेच, कोरोना विषाणूचा संसंर्ग टाळण्याच्या दृष्टीने देण्यात आलेल्या सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

**(राजेश तारवी)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रत माहितीस्तव:**

(१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.

(२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

**प्रति :**

(१) मा.मुख्यमंत्री/मा.उप मुख्यमंत्री/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

(२) मंत्रालयीन विभागाचे सर्व प्रधान सचिव/सचिव

**याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

(१) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

(२) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.